# वृत्तपत्रविदया व जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रम

सोलापूर विद्यापीठाने जनविकास विभागामार्फत वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रम सुरु केला आहे. या अभ्यासक्रमाची उद्दिष्टये, प्रवेश पात्रता, शुल्क, अभ्यासक्रमाचा कालावधी, परीक्षा उत्तीर्णतेचे निकष खालीलप्रमाणे असतील.

## अभ्यासक्रमाची उद्दिष्टये-

१) विदयार्थ्यांना वृत्तपत्र व प्रसारमाध्यमातील विविध कौशल्यांचा परिचय करुन देणे.
२) बातमीलेखन, संपादनाची तंत्रे विद्यार्थ्यांना अवगत करुन देणे.
३) स्थानिक वृत्तपत्रांना प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे.

## प्रवेश पात्रता-

खालील शैक्षणिक पात्रता असणाऱ्या कोणत्याही विद्यार्थ्यास या अभ्यासक्रमास प्रवेश घेता येईल.

१) कोणत्याही विद्यापीठाचा वृत्तपत्रविद्या प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण असलेला विद्यार्थी.
२) बारावी किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असलेला विद्यार्थी.
३) शालांत परीक्षा (दहावी किंवा पूर्वीची अकरावी) उत्तीर्ण + शासनमान्य असलेला दोन वर्षाचा अभ्यासक्रम उत्तीर्ण असलेले विद्यार्थी.

## शिक्षणक्रम कालावधी-

या शिक्षणक्रमाचा कालावधी सहा महिन्यांचा राहील. एखादया विद्यार्थ्याने तीन वर्षात शिक्षणक्रम पूर्ण न केल्यास त्यास पुन्हा प्रवेश घ्यावा लागेल. मात्र त्याने उत्तीर्ण केलेल्या अभ्यासक्रमासाठी सवलत मिळेल.

**अध्यापन -** एक तासिका ६० मिनिटांची असेल. या नुसार प्रत्येक आठवडयात चार विषयांच्या प्रत्येकी किमान दोन या प्रमाणे एकंदर आठ तासिका होणे अपेक्षित आहे. पाच महिन्यात प्रत्येक विषयाच्या प्रत्येक विषयाच्या प्रत्येकी चाळीस तासिका होणे अपेक्षित आहे. चारही विषयांच्या मिळून किमान १६० तासिका होणे अपेक्षित आहे.

**शिक्षकांची पात्रता** - या अभ्यासक्रमास शिकविणारे अध्यापक एम.ए मास कम्युनिकेशनची परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.

**शिक्षणक्रम शुल्क -**

| अनु.क्र | शुल्काचा तपशील | शुल्क (रुपयात) |
|---|---|---|
| १ | नोंदणी शुल्क | १००/- |
| २ | शिक्षणक्रम शुल्क | १,४५०/- |
| ३ | अंतर्गत मूल्यमापन शुल्क | ५००/- |
| ४ | अंतिम परीक्षा शुल्क | २५०/- |
| ५ | पदवी प्रमाणपत्र शुल्क | २५०/- |
| ६ | गुणपत्रक व टपाल खर्च | ५०/- |
| ७ | संवाद अंक वर्गणी | ५०/- |
| ८ | विद्यार्थी कल्याण सेवा | ५०/- |
| ९ | आपत्कालीन सहायता निधी | ५०/- |
| १० | पूरक अध्ययन सेवा | २५०/- |
| | एकूण शुल्क | ३०००/- |

**अभ्यासक्रम -** या विषयाचा अभ्यासक्रम चार विषयात विभागलेला असेल, तो खालीलप्रमाणे.

**अभ्यासक्रम १ - जनसंज्ञापन आधुनिक प्रसार माध्यमे** **१०० गुण**

I) वृत्तपत्रे - उदय, विकास, गुणवैशिष्टये.
II) नभोवाणी - उदय, विकास, गुणवैशिष्टये,
III) चित्रवाणी -
IV) चित्रपट-
V) इंटरनेट -
VI) प्रसारमाध्यमांची कार्ये
VII) प्रसारमाध्यमांचा समाजावरील प्रभाव

**थेअरी - ६० गुण**

**प्रात्यक्षिक - ४० गुण**

I) एका वृत्तपत्र कार्यालयास भेट देऊन त्या वृत्तपत्रातील विविध विभागांची व त्यांच्या कार्याची माहिती देणारा अहवाल तयार करा. (गुण १०)
II) एका रेडिओ केंद्रास भेट देऊन त्या केंद्रतील विविध विभागांची व त्यांच्या कार्याची माहिती देणारा अहवाल तयार करा. (गुण १०)

III) एका टेलीव्हीजन चॅनलला भेट देऊन त्या चॅनलमधील विविध विभागांची व त्यांच्या कार्याची माहिती देणारा अहवाल तयार करा. (गुण १०)

IV) दोन ऑनलाईन वृत्तपत्रांचा दहा दिवसाच्या अंकांचा तुलनात्मक अभ्यास करुन सविस्तर अहवाल तयार करा. (गुण १०)

## अभ्यासक्रम २ - पत्रकार - कार्ये आणि जबाबदारी १०० गुण

I) पत्रकारासाठी आवश्यक गुण
II) वार्तांकासाठी उपयुक्त साधने
III) बातमीची व्याख्या आणि व्याप्ती
IV) बातमीचे स्त्रोत
V) बातमीचे निकष
VI) बातमीची रचना
VII) बातमीलेखन - मथळा, शिरोभाग, विस्तार, पार्श्वभूमी, शेवट
VIII) वृत्तलेख - वृत्तलेखाचे प्रकार, वृत्तलेख लेखन
IX) मुलाखत - मुलाखतीचे प्रकार
X) संपादकीय संस्कार - मुद्रितशोधन, पुनर्लेखन
XI) वृत्तपत्रे, नभोवाणी , चित्रवाणी, ऑनलाईन वृत्तपत्रे, मोबाईल वृत्तासाठी बातमीलेखन.

**थेअरी - ६० गुण**

**प्रात्यक्षिक - ४० गुण**

I) शिरोभागाचे प्रकार सांगून प्रत्येक प्रकारच्या एका शिरोभागाचे लेखन करा. (१० गुण)
II) पाच विविध विषयावर वृत्तलेख लिहा. (१० गुण)
III) विविध क्षेत्रातील पाच व्यक्तींच्या मुलाखती घेऊन त्यांचे लेखन करा. (१० गुण)
IV) रेडिओसाठी, टेलिव्हीजनसाठी प्रत्येकी एक बातमीपत्र तयार करा. (१० गुण)

## अभ्यासक्रम ३ - बातमीची विविध कार्यक्षेत्रे १०० गुण

I) राजकीय वार्तांकन
II) गुन्हेगारीविषयक वार्तांकन
III) न्यायालयीन वार्तांकन
IV) स्थानिक स्वराज्यसंस्था - महापालिका, जिल्हा परिषद इत्यादी
V) विधिमंडळ वार्तांकन - विधानसभा, विधान परिषद, लोकसभा, राज्यसभा

VI) शासकीय कार्यालयेक- विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय
VII) कृषी वार्तांकन
VIII) पर्यावरण वार्तांकन
IX) शिक्षणविषयक वार्तांकन
X) आरोग्यविषयक वार्तांकन
XI) व्यापार - उदयोगविषयक वार्तांकन
XII) सहकारी संस्थांचे वार्तांकन
XIII) शोध पत्रकारिता
XIV) विकास पत्रकारिता
XV) विश्लेषणात्मक / सखोल वार्तांकन
XVI) विज्ञान-तंत्रज्ञान वार्तांकन
XVII) क्रीडा क्षेत्राचे वार्तांकन

**थेअरी - ६० गुण**

**प्रात्यक्षिक - ४० गुण**

a) बातमीलेखन - राजकीय, गुन्हेगारीविषयक, न्यायालयीन, शिक्षण, सहकार, उदयोक, पर्यावरण, कृषी, विज्ञान, आरोग्य, महापालिका, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय या विषयाशी संबंधित प्रत्येकी दोन बातम्याचे लेखन करा. (१० गुण)
b) शोधपत्रकारिता, विकास पत्रकारिता, सखोल वार्ता प्रत्येकी दोन बातम्या लिहा. (१० गुण)
c) दोन चित्रपट, दोन नाटक यांचे परीक्षण करणारे लेख लिहा. (१० गुण)
d) सांस्कृतिक, क्रीडाविषयक प्रत्येकी पाच बातम्यांचे लेखन करा. (१० गुण)

**अभ्यासक्रम ४ - संपादक - कार्य आणि जबाबदारी १०० गुण**

I) वृत्तपत्राच्या संपादकीय विभागाची रचना व विविध विभागाची कार्य
II) संपादकाची कार्य व जबाबदारी
III) वृत्तसंपादकाची कार्य व जबाबदारी
IV) सहसंपादकाची कार्य व जबाबदारी
V) मुख्य उपसंपादकाची कार्य व जबाबदारी
VI) मुख्य वार्ताहराची कार्य व जबाबदारी
VII) उपसंपादकाची कार्य व जबाबदारी
VIII) विशेष प्रतिनिधी कार्य व जबाबदारी
IX) अग्रलेख लेखन, स्फुटलेखन, साईड आर्टीकल

**थेअरी - ६० गुण**

**प्रात्यक्षिक -४० गुण**

I) एका वृत्तपत्राच्या कार्यालयास भेट देऊन त्यातील संपादक, वृत्तसंपादक, सहसंपादक, मुख्य उपसंपादक, मुख्य वार्ताहर, उपसंपादक यांच्या मुलाखती घेऊन त्याआधारे त्यांच्या कार्याबाबत अहवाल लिहा. (१० गुण)

II) विविध पाच विषयावर अग्रलेख लिहा. (१० गुण)

III) पाच विषयांवर स्फुटलेखन करा. (१० गुण)

IV) पाच विषयांवर साईड आर्टिकल लिहा. (१० गुण)

## अंतिम परीक्षा -

अंतिम परीक्षा एकूण ४०० गुणांची असेल. यात प्रत्येक विषयाची थेअरीची ६० गुणांची परीक्षा व ४० गुणांची अंतर्गत परीक्षा असेल. प्रात्यक्षिके पूर्ण केल्याशिवाय विद्यार्थ्यास थेअरी परीक्षेस बसता येणार नाही. थेअरी व प्रात्यक्षिक परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी स्वतंत्रपणे किमान ४० टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | विषय | थेअरीचे गुण | प्रात्यक्षिकाचे गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| १ | **जनसंज्ञापन आधुनिक प्रसार माध्यमे** | ६० | ४० | १०० |
| २ | **पत्रकार - कार्य आणि जबाबदारी** | ६० | ४० | १०० |
| ३ | **बातमीची विविध कार्यक्षेत्रे** | ६० | ४० | १०० |
| ४ | **संपादक- कार्य आणि जबाबदारी** | ६० | ४० | १०० |
| | **एकूण** | २४० | १६० | ४०० |

## प्रश्नपत्रिकेचे स्वरुप -

१) प्रश्न १ योग्य पर्याय निवडा. प्रत्येकी एका गुणाचे दहा प्रश्न गुण १०

२) प्रश्न २ संक्षिप्त उत्तरे दया. प्रत्येकी तीन गुणांचे पाचपैकी चार प्रश्न सोडवा. गुण १२

३) प्रश्न ३ टीपा लिहा. प्रत्येकी चार गुणांचे तीनपैकी दोन प्रश्न सोडवा गुण ०८

४) प्रश्न ४ सविस्तर उत्तरे लिहा. प्रत्येकी दहा गुणांचे चार पैकी कोणतेही तीन दीर्घोत्तरी प्रश्नाची उत्तरे लिहा. गुण ३०

**सोलापूर विद्यापीठ ,सोलापूर**

जनविकास केंद्र

**वृत्तपत्र विद्या व जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रम**

| | |
|---|---|
| वार - शुक्रवार | वेळ ११.००A.M. ते २.०० P.M. |
| दिनांक-१२/०२/२०१६ | गुण -६० |
| विषय- पत्रकार कार्ये आणि जबाबदारी | पेपर क्रं-१ |

**सूचना : सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**

**उजवीकडील अंक गुण दर्शवितात.**

**प्रश्न क्र -१:- योग्य पर्याय निवडा** **गुण-१०**

१. बातमीची रचना -------------------- सारखी असते.

अ) सुलटा त्रिकोण ब) उलटा त्रिकोण क) चौकोन ड) यापैकी नाही.

२. वृत्तपत्रासाठी लेखन करणा-यास------------------- म्हणतात.

अ) पत्रकार ब) लेखक क) मुद्रितशोधक ड) यापैकी नाही.

३. दुस-याला सांगाविशी वाटणरी घटना म्हणजे----------- ---- होय

अ) कथा ब) बातमी क) लेख ड) यापैकी नाही.

४. बातमीचे मूल्य--------------- वरुन ठरते.

अ) ताजेपणा ब) नजिकता क) माहात्म्य ड) वरील सर्व

५. मोबाईल हे ---------------- माध्यम आहे.

अ) जनसंवाद ब) बहु क) दुरध्वनी ड) व्हिडीओ

६. ग्रामीण भागातून बातम्या पाठविणा-याला ------------------- म्हणतात.

अ) ग्रामीण पत्रकार ब) ग्रामीण वार्ताहर क) ग्रामीण संज्ञापक ड) वरील सर्व

७. बातमीच्या पहिल्या परिच्छेदाला --------------------- म्हणतात

अ) शिरोभाग ब) मथळा क) शिर्षक ड) यापैकी नाही.

८. बातमीमध्ये वार्ताहराने केलेल्या निवेदनाला इंग्रजीत------------------------ असे म्हणतात.

अ) साऊंड बाईट ब) पीस टु कॅमेरा क) कॉमेंट्री ड) यापैकी नाही.

९. मुलाखतीची तयारी करताना------------------------------ माहित असणे अत्यावश्यकआहे.

अ) लक्ष्यगट ब) कालावधी क) उददीष्ट ड) वरील सर्व

१०. --------------------- हाच माहितीपटांचा आत्मा असतो.

११. अ) सत्यघटना ब) निवेदन क) समग्र संशोधन ड) यापैकी नाही.

**प्रश्न क्र २: संक्षिप्त उत्तरे दया. (कोणतेही चार)** **गुण -१२**

१. संपादकाच्या अंगी कोणते गुण असणे आवश्यक आहेत ?

२. पत्रकारांमध्ये कोणा-कोणाचा समावेश होतो ते सांगा?

३. बातमीची व्याख्या करा

४. मुलाखतीचे विविध प्रकार नमुद करा

५. वार्तांकनासाठी उपयुक्त साधने कोणती ते सांगा?

**प्रश्न क्र ३:- टीपा लिहा** **गुण- ०८**

१. श्रमिक पत्रकार

२. ऑनलाईन वृत्तपत्रे

३ वृत्तलेखाचे प्रकार

**प्रश्न क्र ४:- सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन )** **गुण -३०**

१. पत्रकार होण्यासाठी आवश्यक असलेल्या किमान पात्रतेच्या अटी कोणत्या ते नमुद करा

२. नभोवाणीसाठी बातमी लेखन कसे कराल ते सोदाहरण सांगा

३. शिरोभागाचे विविध प्रकार सांगून एका शिरोभागाचे लेखन करा

४. संपादकीय संस्कार म्हणजे काय ते सांगून मुद्रितशोधनाचे महत्व स्पष्ट करा.

**सोलापूर विद्यापीठ ,सोलापूर**

जनविकास केंद्र

**वृत्तपत्र विद्या व जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रम**

| | |
|---|---|
| वार - सोमवार | वेळ ११.००A.M. ते २.०० P.M. |
| दिनांक-१५/०२/२०१६ | गुण -६० |
| विषय- जनसंज्ञापन आधुनिक प्रसार माध्यमे | पेपर क्रं-२ |

**सूचना : सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**

**उजवीकडील अंक गुण दर्शवितात.**

**प्रश्न क्र -१ योग्य पर्याय निवडा** **गुण-१०**

१. मल्टीमीडियामध्ये ------------------- चा अंतर्भाव होतो.

अ) चलचित्र ब) ध्वनी क) शब्द ड) यापैकी सर्व

२. ---------------- हे सोलापूर मधील पहिले वृत्तपत्र आहे.

अ) समाचार ब) संचार क) लोकमत ड) यापैकी नाही.

३. बाळशास्त्री जांभेकर यांनी ------------------ वृत्तपत्र सुरु केले

अ) दर्पण ब) संग्राम क) साहित्य ड) यापैकी नाही.

४. ------------------ ही दैनिक दिव्य मराठीची साप्ताहीक पुरवणी आहे.

अ) रसिक ब) लोकरंग क) मंथन ड) यापैकी नाही.

५. ----------------- यांना भारतीय चित्रपटाचा जनक म्हणतात.

अ) नटराज मुदलियार ब) दादासाहेब फाळके क) गुरु दत्त ड) यापैकी नाही.

६. मराठा वृत्तपत्र ----------------- यांनी सुरु केले.

अ) लोकमान्य टिळक ब) महात्मा गांधी क) महात्मा फुले ड) यापैकी नाही.

७. ------------------- यांस लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून संबोधले जाते.

अ) चित्रवाणी ब) वृत्तपत्र क) रेडिओ ड) यापैकी सर्व

८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ---------------------- हे वृत्तपत्र सुरु केले

अ) समाज ब) दृष्टी क) मूकनायक ड) यापैकी नाही

९. सायबर गुन्हे--------------------------- शी संबधीत आहेत.

अ) इंटरनेट ब) चित्रवाणी क) वृत्तपत्र ड) यापैकी नाही

१०. सिनेमा हे ----------------- प्रकारचे माध्यम आहे.

अ) दृक  ब) श्राव्य  क) दृकश्राव्य  ड) यापैकी नाही.

**प्रश्न क्र-२ संक्षिप्त उत्तरे दया.  ( पाचपैकी कोणतेही -चार )  गुण -१२**

१. रेडिओच्या मर्यादा स्पष्ट करा

२. इंटरनेट आणि पत्रकारिता या विषयावर संक्षिप्त टीप लिहा.

३. चित्रपट रसस्वाद म्हणजे काय

४. 'प्रसारमाध्यम' ही संकल्पना स्पष्ट करा

५. ऑनलाईन वृत्तपत्र म्हणजे काय

**प्रश्न क्र-३ टिपा लिहा  ( तीनपैकी कोणत्याही - दोन )  गुण- ०८**

१. फेसबुक

२. रियालिटी शो

३. किसानवाणी

**प्रश्न क्र-४ सविस्तर उत्तरे लिहा  ( चारपैकी कोणतेही - तीन )  गुण- ३०**

१. चित्रपट निर्मितीसाठी आवश्यक घटकांची चर्चा करा

२. इंटरनेटची गुणवैशिष्ट्ये विशद करा

३. इंटरनेटच्या वापराचा लहान मुलांवर होणा-या परिणामांची चर्चा करा

४. समांतर सिनेमा या विषयावर निबंध लिहा

**सोलापूर विद्यापीठ ,सोलापूर**

जनविकास केंद्र

**वृत्तपत्र विद्या व जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रम**

| | |
|---|---|
| वार - मंगळवार | वेळ ११.००A.M. ते २.०० P.M. |
| दिनांक-१६/०२/२०१६ | गुण -६० |
| विषय- बातमीची विविध कार्यक्षेत्रे | पेपर क्रं-३ |

**सूचना : सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**

**उजवीकडील अंक गुण दर्शवितात.**

**प्रश्न क्र-०१ योग्य पर्याय निवडा** **गुण-१०**

१. पोलिस स्टेशनमध्ये गुन्हयाची नोंद सर्वप्रथम-------------------- मध्ये केली जाते.
अ) एफ.आय.पी रजिस्टर ब) एफ.आय.जी रजिस्टर क) एफ.आय. आर. रजिस्टर ड) यापैकी नाही.

२. विधीमंडळात लोकप्रतिनिधींना जो अधिकार असतो त्यास --------------- म्हणतात.
अ) लोकाधिकार ब) विशेषाधिकार क) मानवाधिकार ड) यापैकी नाही.

३. ------------------ यांची पत्रकारिता विकास पत्रकारिता म्हणून संबोधली जाते.
अ) मधुकर भावे ब) कुमार केमकर क) अतुल देऊळगावकर ड) यापैकी नाही.

४. सोलापूर महापालिकेच्या महापौर ------------------------- आहेत.
अ) सुशिला आबुटे ब) सत्यशिला गायकवाड क) अलका राठोड ड) यापैकी नाही.

५. सोलापूर महापालिकेच्या वतीने ----------------------- योजनेतील सहभागासाठी प्रयत्न केले जात आहे.
अ) जलयुक्त शिवार ब) जनधन योजना क) स्मार्ट सिटी ड) यापैकी नाही.

६. महाराष्ट्रात जिल्हा परिषदांची संख्या------------------- एवढी आहे.
अ) पस्तीस ब) छत्तीस क) चौतीस ड) यापैकी नाही.

७. कोणासही सुगावा लागू न देता ज्या बातमीचा तपशील मिळवला जातो त्यास -------------- म्हणतात.
अ) विकास बातमी ब) शोध बातमी क) सखोल बातमी ड) यापैकी नाही.

८. नागरिकांचे दरडोई उत्पन्न वाढल्याची बातमी -------------------- या प्रकारात नोंदली जाते
अ) शोध वार्ता ब) विकास वार्ता क) वाणिज्य वार्ता ड) यापैकी नाही.

९. ---------------- सभागृहातील सदस्य नागरिकांच्या थेट मतदानातून निवडले जातात.
अ) राज्यसभा ब) विधानसभा क) विधान परिषद ड) यापैकी नाही.

१०. लोकशाही दिनाचे कामकाज ------------------ कार्यालयामार्फत चालते.

अ) जिल्हाधिकारी ब) जिल्हा परिषद क) महापालिका ड) यापैकी नाही.

**प्रश्न क्र -२ संक्षिप्त उत्तरे लिहा. ( कोणतेही - चार ) एकूण गुण -१२**

१. भारतीय खेळांचे वार्तांकन करताना कोणती खबरदारी घ्यावी?

२. कृषी वार्तांकनासाठी रब्बी हंगामात कोणत्या बातम्यांवर भर दयावा?

३. जिल्हा परिषदेत वार्तांकनाच्या दृष्टीने कोणते विभाग महत्वाचे असतात. ?

४. भाजीपाल्याचे बाजारभाव कोठे व कसे मिळवाल?

५. न्यायालयाचे विविध प्रकार कोणते?

**प्रश्न क्र-३ टीपा लिहा (कोणतेही - दोन ) गुण-८**

१. विधी मंडळ वार्तांकन

२. महापालिका वार्तांकन

३. आरोग्य वार्तांकन

**प्रश्न क्र-४ कोणतेही तीन प्रश्न सोडवा गुण- ३०**

१. विकास पत्रकारिता म्हणजे काय ते सांगून विविध उदाहरणे दया

२. शोध पत्रकारितेसाठी आवश्यक गुण कोणते?

३. गुन्हेगाराविषयक वार्तांकन कसे करावे?

४. राजकीय वार्तांकन करताना कोणती खबरदारी घ्यावी. ?

**सोलापूर विद्यापीठ ,सोलापूर**

जनविकास केंद्र

**वृत्तपत्र विद्या व जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रम**

वार - बुधवार | वेळ ११.००A.M. ते २.०० P.M.

दिनांक-१७/०२/२०१६ | गुण -६०

विषय- संपादक कार्ये आणि जबाबदारी | पेपर क्रं-४

**सूचना : सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**

**उजवीकडील अंक गुण दर्शवितात.**

**प्रश्न क्र-१ योग्य पर्याय निवडा** **गुण -१०**

१. वार्ताहराला वृत्तपत्राचे ----------------- म्हणतात.

अ) कान व डोळे ब) आत्मा क) प्राण ड) यापैकी नाही.

२. वृत्तपत्राच्या कार्यालयात ------------------ विभाग हया सर्व विभागावर नियंत्रण व देखरेख ठेवण्याचे काम करतो.

अ) संपादकीय ब) जाहिरात क) व्यवस्थापक ड) मुद्रण

३. मिडल म्हणजे-------------- ----------

अ) मुख्य लेखाच्या बाजूचा लेख ब) विशेष संपादकीय क) अध्यात्मिक लेखन

ड) वाचकांचा पत्रव्यवहार

४. मोठया वृत्तपत्रांच्या नोकरीत असलेल्या आणि राज्याच्या राजधानीतील वार्तांकन करणा-या व्यक्तीला काय म्हणतात.

अ) स्ट्रिंगर ब) मुक्त पत्रकार क) विशेष प्रतिनिधी ड) वृत्तप्रतिनिधी

५. सोलापूर दैनिक लोकमत आवृत्तीचे ------------------ ------- हे संपादक आहेत.

अ) राजा माने ब) दयानंद माने क) बाबुराव माने ड) अभय दिवाणजी

६. --------------------- हा वृत्तपत्राचा कणा असतो.

अ) संपादक ब) व्यवस्थापक क) उपसंपादक ड) जाहिरात प्रमुख

७. संपादकीय लेखनात ----------------- आणि----------------------- स्तंभ असे दोन प्रकार असतात.

अ) अग्र लेख आणि स्फुट लेखनाचा ब) बातमी आणि लेखाचा क) स्फुट आणि साईड आर्टिकलचा

ड) यापैकी नाही.

८. वृत्तपत्राच्या संपादकीय पानावर वाचकांचे मत व्यक्त करण्यासाठी दिलेल्या मजकुरास -------------- म्हणतात.

अ) वाचकांचा पत्रव्यवहार ब) संपादकीय लेख क) स्तंभ लेख ड) अग्रलेख

९. वृत्त संकलन म्हणजे योग्य त-हेने लिहिलेली ------------------------------

अ) लेख ब) बातमी क) जाहिरात ड) अग्रलेख

१०. वृत्तसंपादक बातम्यांची निवड केल्यानंतर त्याचा एक संक्षिप्त आराखडा तयार करतो त्यास ----------- म्हणतात.

अ) क्युसिट ब) वेळसिट क) फिडसिट ड) वरील सर्व

**प्रश्न क्र-२ संक्षिप्त उत्तरे दया (कोणतेही चार ) गुण -१२**

१. वृत्तपत्रातील साईड आर्टिकलचे महत्व लिहा.

२. विशेष प्रतिनिधी कोणास म्हटले जाते ?

३. संपादकाचे महत्व लिहा

४. वार्ताहर कोणास म्हटले जाते ?

५. वृत्त संपादकाची कामे लिहा

**प्रश्न क्र-३ टीपा लिहा (कोणतेही दोन) गुण- ०८**

१. कार्यकारी संपादक

२. अग्रलेख

३. संपादकीय विभागाची रचना

**प्रश्न क्र-४ सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) गुण - ३०**

१. उपसंपादकाची कार्ये आणि जबाबदारी स्पष्ट करा

२. वृत्त संपादकाची जबाबदारी कोणती आहे ?

३. वृत्तपत्रात स्फुट लेखनाचे महत्व सांगा

४. वृत्तपत्राच्या विविध विभागाची कार्ये स्प्ष्ट करा.